महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २६९ वे | दिनांक : २५/०९/२०२६ | वार : शुक्रवार







## दुष्काळी दौऱ्यावर फडणवीस; वंचित शेतकऱ्यांना कर्जमाफीची घोषणा



**मुंबई :** राज्यातील भीषण दुष्काळी परिस्थिती आणि पावसाच्या प्रदीर्घ खंडाने उभी पिके करपून गेल्याच्या पार्श्वभूमीवर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पुन्हा एकदा थेट बांधावर उतरले आहेत. काल मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागाचा दौरा केल्यानंतर, मुख्यमंत्री आज विदर्भातील अमरावती आणि वाशिम जिल्ह्यांच्या दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यात ते प्रत्यक्ष बांधावर जाऊन पिकांची पाहणी करणार असून, संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांशी थेट संवाद साधणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांना मोठा दिलासा देणारी घोषणा केली आहे. राज्य सरकार लवकरच कोरड्या दुष्काळाचा जीआर काढणार असून, संकटात सापडलेल्या प्रत्येक शेतकऱ्याला सरकारकडून पूर्णपणे मदत केली जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले. यासोबतच, 2016-17 च्या कर्जमाफी योजनेतून जे शेतकरी काही कारणास्तव वंचित राहिले होते, त्यांनाही आता या कर्जमाफीचा लाभ दिला जाईल, अशी घोषणा फडणवीस यांनी केली. तसेच, पीकविम्यासंदर्भात शेतकऱ्यांच्या ज्या काही अडचणी आणि प्रलंबित प्रश्न आहेत, ते सर्व प्राधान्याने आणि तातडीने सोडवले जातील, असे आश्वासनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

दरम्यान, बुधवारी मुख्यमंत्र्यांनी लातूर, धाराशिव आणि सोलापूर जिल्ह्यांचा दौरा केला. लातूर जिल्ह्यातील 'जाऊ' गावात पिकांची आणि पाण्याची स्थिती पाहिल्यानंतर हा दुष्काळ 1972 पेक्षाही भीषण असल्याची परिस्थिती समोर आली आहे. यावेळी आपल्या उद्ध्वस्त पिकांची अवस्था मुख्यमंत्र्यांना सांगताना शेतकऱ्यांना अक्षरशः रडू कोसळले. हतबल झालेल्या शेतकऱ्यांचे अश्रू पुसत मुख्यमंत्र्यांनी त्यांना धीर दिला आणि "शेतकऱ्यांना पुन्हा उभे करण्यासाठी सर्व काही करू," असा शब्द दिला. राज्यातील दुष्काळी स्थिती राज्य सरकारने अत्यंत गांभीर्याने घेतली आहे. "येत्या तीन दिवसांत दुष्काळाची पहिली अधिसूचना काढण्यात येईल," अशी अत्यंत महत्त्वाची माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली. तसेच, प्रशासनाला नुकसानीचे पंचनामे तातडीने सुरू करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. रब्बी हंगामासाठी शक्य ती सर्व मदत केली जाईल आणि जोपर्यंत सर्वांना लाभ मिळत नाही, तोपर्यंत कर्जमाफीची प्रक्रिया थांबणार नाही, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. दुष्काळ निवारणाच्या उपाययोजनांबद्दल बोलताना मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांना आश्वस्त केले. "दुष्काळाबाबतचे सर्व अहवाल आम्ही गोळा केले असून त्यानुसार कारवाई सुरू आहे. पिण्याचे पाणी, जनावरांचा चारा यासाठी लागणाऱ्या अतिरिक्त निधीची तजवीज केली जात असून, सरकारकडे निधीची कोणतीही कमतरता पडू देणार नाही," असे फडणवीस म्हणाले.

## पारसिक हिलवरून कार रेल्वे रुळावर; तरुण गंभीर



**नवी मुंबई :** नवी मुंबईतील सीबीडी बेलापूर येथील पारसिक हिल परिसरात गुरुवारी दुपारी अंगावर काटा आणणारा अत्यंत भीषण आणि विचित्र अपघात घडला. पारसिक हिलच्या उंचावरील डोंगरावरून चालकाचे नियंत्रण सुटल्याने एक भरधाव कार थेट शेकडो फूट खाली असलेल्या पनवेल-उरण रेल्वे रुळावर येऊन आदळली. या भीषण अपघातात कारचा अक्षरशः चक्काचूर झाला असून कारमधील १७ वर्षीय तरुण गंभीर जखमी झाला आहे. घटनेच्या वेळी रुळावरून लोकल ट्रेन जात नसल्याने मोठा अनर्थ आणि संभाव्य भीषण जीवितहानी टळली; मात्र या दुर्घटनेमुळे हार्बर उपमार्गावरील पनवेल-उरण लोकल वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, गुरुवारी दुपारी ३ ते ३.३० वाजेच्या सुमारास हा थरार घडला. बेलापूर रेल्वे स्थानकानजीक असलेल्या पारसिक हिलच्या बोगद्यापुढील डोंगराळ भागातील रस्त्यावरून एक चारचाकी जात होती. वळणावर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि ही कार थेट दरीसारख्या उतारावरून हवेत उडत थेट खाली असलेल्या रेल्वे ट्रॅकवर कोसळली. प्रचंड उंचीवरून पडल्यामुळे झालेल्या जोरदार आवाजाने आजूबाजूच्या परिसरात एकच खळबळ उडाली. या अपघातात कारचे पत्रे, इंजिन आणि काचांचा चुराडा झाला. कारमध्ये असलेला 17 वर्षीय चालक तरुण रक्ताच्या थारोळ्यात अडकला होता. त्याला स्थानिक नागरिक, पोलीस आणि अग्निशमन दलाच्या मदतीने तातडीने बाहेर काढून जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात येत आहे.

## तेलंगणाचा घातक कचरा नांदेडमार्गे सिल्लोडमध्ये; ५ कोटींच्या नफ्याचा आरोप



**छत्रपती संभाजीनगर :** कंपन्यांच्या घातक कचऱ्यावर शास्त्रीय प्रक्रिया करण्याऐवजी तेलंगणातील 'व्हीबीआर ग्रीन एन्व्हायरो' कंपनी महाराष्ट्रातील नागरिकांच्या आरोग्याशी खेळत आहे. हा धक्कादायक प्रकार 'दिव्य मराठी'च्या इन्व्हेस्टिगेशनमधून समोर आला आहे. पेंट, औषध निर्मितीनंतर २५ ते ३०% घातक कचरा (हझार्ड्स वेस्ट) उरतो. तेलंगणातील 'व्हीबीआर'ने प्रक्रिया करण्यासाठी हा कचरा संकलित केला. पण प्रक्रियेऐवजी दलालांमार्फत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या सिल्लोड-सोयगाव तालुक्यातील गावांत उघड्यावर फेकला. याप्रकरणी ४ जुलैला सिल्लोड ग्रामीणमध्ये गुन्हा दाखल असून १२ आरोपी अटकेत आहेत. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (सीपीसीबी) नियमानुसार अधिकृत केंद्रांमध्येच कचऱ्यावर उच्च तापमानाच्या भट्टीत विल्हेवाट लावणे बंधनकारक. यासाठी प्रत्येक उत्पादक कंपनीला प्रक्रिया केंद्रासोबत करारही करावा लागतो. कचऱ्याचा प्रकार आणि वजनानुसार कंपनी प्रक्रिया केंद्रांना मोठे शुल्कसुद्धा अदा करते. मात्र, या शुल्कातील तब्बल ७५ ते ८०% रक्कम केवळ प्रक्रियेसाठी लागणारी महागडी रसायने, यंत्रसामग्री, वीज बिल, वाहतूक आणि कुशल मनुष्यबळावर खर्च करावा लागतो. हाच खर्च टाळण्यासाठी 'व्हीबीआर' कंपनीचे संचालक चालबाजी करत महाराष्ट्रातील दलालांना पैसे देऊन सिल्लोडच्या संगारेड्डी जिल्ह्यातून घातक कचरा सिल्लोड आणि सोयगाव तालुक्यातील पळशी, फर्दापूर, आळंद, शिऊर, तोंडापुरात मध्यरात्री आणून टाकतात. हे रॅकेट एक वर्षापासून सुरू आहे. व्हीबीआरकडून एका ट्रकसाठी इस्तेकारला ७५ हजार रुपये मिळतात. संगारेड्डी ते सिल्लोड प्रवास ४०-४५ हजार रुपयांत होतो. सिल्लोडच्या अब्दुल व इस्तेकारला प्रत्येकी १५ हजार रुपये नियमितपणे मिळायचे. 'व्हीबीआर'ने कचरा जरी उघड्यावर टाकला तरी ज्या कंपन्यांतून तो निघाला त्याही तेवढ्याच जबाबदार आहेत. नियमाप्रमाणे त्यांनी कचऱ्यावर प्रक्रिया केल्याची पोचपावती घेतली का, हे तपासण्यासाठी कंपन्यांची चौकशी करू. तत्पूर्वी सीपीसीबीच्या निर्देशांनुसार पोलिसांसमवेत एक समिती गठित केली जाईल. - अच्युत नांदवटे, उपप्रादेशिक अधिकारी, एमपीसीबी

'व्हीबीआर'ने इस्तेकारला कचरा दिला. हैदराबादची अल-यासीन ट्रान्सपोर्ट व संभाजीनगरच्या साऊथ गुजरात ट्रान्सपोर्टच्या ट्रकमधून सिल्लोडमध्ये आणला. याप्रकरणी आतापर्यंत १२ जणांना अटक करण्यात आली आहे. - रवींद्र ठाकरे, सहायक पोलिस निरीक्षक, सिल्लोड ग्रमीण

इस्तेकारने वीटभट्टीसाठी इंधन म्हणून हा कचरा नेला. तो त्याने उघड्यावर फेकल्याचे आम्हाला माहीत नाही. आमच्या कंपनीचा यात काही दोष नाही. उलट यामुळे आमचे आर्थिक नुकसान झाले आहे. -वीरशेम भीमय्या खरचेला, संचालक, व्हीबीआर ग्रीन

एन्व्हायरोसल्जेस, स्पेंट सॉल्व्हेंट्स, स्पेंट कॅटेलिस्ट, ईटीपी स्लजेस, खराब झालेले कंटेनर आणि लायनर्स, डिस्टिलेशन रेसिड्यू, तसेच एक्स्पायरी डेट झालेले किंवा क्वालिटी कंट्रोल चाचणीत फेल झालेल्या विषारी रासायनिक पदार्थांचा या कचऱ्यात समावेश असतो.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २५ सप्टेंबर २०२६


## अंजिक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा उत्साहात संपन्न



**बीड (प्रतिनिधी) :** बीड जिल्हा कबड्डी असोसिएशन व शारदा स्पोर्ट क्लब गेवराई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अंजिक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा -2026 या स्पर्धा श्री. शिवाजीराव पंडित महाविद्यालय, शिवाजीनगर, गढी येथे शिवछत्र स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स मध्ये उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाल्या. या स्पर्धेचे उदघाटन शारदा स्पोर्ट्स कल्ब चे अध्यक्ष युवा नेते श्री . रणवीर (काका )अमरसिंह पंडित यांच्या शुभहस्ते संपन्न झाले होते..श्री रणवीर काका पंडित व बीड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे कार्यवाह प्राचार्य.डॉ.विश्वास कदम यांनी खेळाडूंना मार्गदर्शन करून प्रोत्साहन दिले.या स्पर्धेत कुमार गटात सर्व प्रथम क्रंमाकचे बक्षीस विभागुन धसदादा क्रिडा मंडळ, आष्टी व शारदा स्पोर्ट्स क्लब गेवराई या संघाने मिळविले तर कुमार गटातील तृतीय क्रंमाकाचे बक्षीस विभागुन जय हनुमान क्रिडा मंडळ, महासांगवी ता. पाटोदा व ण्णा हेल्थ क्लब,कुसळंब या संघाने मिळविले तर कुमारी गटात सर्व प्रथम बक्षीस विभागुन शारदा स्पोर्ट्स क्लब, गेवराई व ऑल स्पोर्ट्स अकॅडमी शिरूर कासार या संघाने मिळविले तर तृतीय क्रंमाकाचे बक्षीस जयभवानी हायस्कुल, शिवाजीनगर, गढी या संघाने प्राप्त केले. नियोजनपूर्वक व शिस्ती मध्ये उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झालेल्या स्पर्धेतुन विरार पश्चिम ता. वसई जि.पालघर येथे होणाऱ्या 53 व्या कुमार/कुमारी राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेसाठी बीड जिल्ह्याचा संघ निवडला जाणार आहे.या अंजिक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत यशस्वी झालेल्या क्रिडा मंडळाचे व खेळाडुचे बीड जिल्हा कबड्डी असोसिएशन चे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री मा.श्री.शिवाजीरावदादा पंडित महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे राज्य उपाध्यक्ष माजी आ. श्री.अमरसिंह(भैय्यासाहेब) शिवाजीराव पंडित, बीड जिल्हा कबड्डी असोसिएशन चे अध्यक्ष आ.श्री.विजयसिंह पंडित, मा.श्री.जयसिंह(भाऊ) शिवाजीराव पंडित,युवा नेते मा.श्री.पृथ्वी दादा जयसिंह पंडित यांनी विजयी संघाचे खेळाडूंचे,व प्रशिक्षकांचे हार्दिक अभिनंदन करुन! निवड झालेल्या सर्व खेळाडूंना राज्य स्तरीय स्पर्धेसाठी हार्दिक शुभेच्छा! दिल्या.

## शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार, शेतमजुरांना २० हजार रुपये सानुग्रह अनुदान द्या - ॲड. वसंतराव मनकर



**हिंगोली :** महाराष्ट्रातील अनेक भागांत निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती अत्यंत गंभीर असून, १९७२ च्या दुष्काळापेक्षाही आजची परिस्थिती अधिक व्यापक आणि चिंताजनक बनली आहे. त्यामुळे शासनाने कोणतीही प्रतीक्षा न करता संपूर्ण महाराष्ट्र दुष्काळग्रस्त जाहीर करून शेतकरी व शेतमजुरांना तातडीने मदत करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी किसान सभेचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष ॲड. वसंतराव मनकर यांनीउपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे केली आहे.दुष्काळामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. शासन परिस्थितीचा आढावा घेत असून शेतकऱ्यांच्या हिताचे विविध निर्णय घेतले जात आहेत. मात्र, सध्याची परिस्थिती पाहता अधिक व्यापक आणि तातडीच्या उपाययोजनांची गरज आहे.शासनाने तातडीने पुढील निर्णय घ्यावेत, अशी मागणी अॅड. मानकर यांनी केली आहे1)शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये नुकसानभरपाई द्यावी 2) शेतमजुरांना किमान २० हजार रुपये सानुग्रह अनुदान द्यावे 3) जनावरांसाठी चारा छावण्या सुरू कराव्यात 4) ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याची कायमस्वरूपी व्यवस्था करावी. 5) रोजगार हमीची कामे मोठ्या प्रमाणावर सुरू करावीत. 6) थकीत पीक विम्याची रक्कम तातडीने शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावी. 7) विद्यार्थ्यांसाठी संपूर्ण शैक्षणिक शुल्क व आवश्यक शैक्षणिक मदतीबाबत विशेष उपाययोजना कराव्यात. 8) पीक कर्जमाफीबाबत तातडीने निर्णय घ्यावा 9) फळबागा वाचविण्यासाठी विशेष संरक्षण व आर्थिक मदत योजना जाहीर करावी.10) शेतीसाठी विनाखंडित वीजपुरवठा सुनिश्चित करावा. अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे किसान सभेचे प्रांताध्यक्ष एडवोकेट वसंतराव मनकर यांनी राज्याच्या उपमुख्यमंत्री राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या राष्ट्रीय अध्यक्ष श्रीमती सुनेत्रा अजितदादा पवार यांच्याकडे केली आहे. महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थिती पाहता राष्ट्रवादी किसान सभा राज्यभरात प्रत्येक विभागात दुष्काळी परिषदा घेऊन शेतकरी व कार्यकर्त्यांची भावना व परिस्थितीचा आढावा घेणार असल्याचेही राष्ट्रवादी काँग्रेस किसान सभा प्रदेश अध्यक्ष अॅड वसंतराव मनकर यांनी स्पष्ट केले.


Education of the Day

YCMOU सेंटर कोड : 21187

YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुवर्णसंधी

B.A.(मराठी व उर्दू माध्यम)

M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन

9405109103, 8830838903


## राष्ट्रीय सेवा योजना दिवस विविध उपक्रमाने साजरा



**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे) :** तालुक्यातील गुंजोटी येथे आज 24 सप्टेंबर हा दिवस राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवसाच्या निमित्ताने श्रीकृष्ण महाविद्यालयात विकसित भारत नोंदणी अभियानांतर्गत स्वच्छता मोहीम, नशामुक्त भारत अभियान आणि सेवासंकल्प अभियानांतर्गत विद्यार्थी आणि शिक्षकांनी मिळून विविध उपक्रम राबविण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गुलाब राठोड तर व्यासपीठावर प्रा. डॉ. आसिया चिश्ती , प्रा. डॉ. जगदीश नन्नावरे, प्रा.डॉ.किसान लोहार ,राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. भाऊसाहेब उगले, प्रा. डॉ. बालाजी कोनाळे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या आरंभी महात्मा गांधी आणि संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केल्यानंतर राष्ट्रीय सेवा योजनेची स्थापना झाल्यापासून ते आजपर्यंतच्या वाटचालीचा प्रवास उलगडून दाखवत आज महाविद्यालयात आयोजित केलेल्या विकसित भारत नोंदणी अभियानांतर्गत नशामुक्त कार्यक्रम,स्वच्छता अभियान,वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन कार्यक्रमाची रुपरेषा आणि अग्रक्रमाची माहिती देऊन कु. स्वाती शिंदे हिने कार्यक्रमाचे सविस्तर असे प्रास्ताविक केले. कू. साईरजनी व्हटकर हिने सर्वांना नशामुक्तीची सामूहिक शपथ दिली. त्यानंतर राष्ट्रीय सेवा योजनेच्या संयमसेवकांचा सहभाग घेऊन महाविद्यालयाच्या परिसरात विविध उपक्रम राबविण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर सर्व कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येनी उपस्थित होते. या सूत्रसंचालन आणि उपक्रमाचे विद्यार्थी नेतृत्व कु. आकांक्षा म्हेत्रे हिने केले तर कार्यक्रमाला उपस्थित सर्वांचे सविस्तर आभार कु. गायत्री पालवे हिने मांडले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २५ सप्टेंबर २०२६


# माणसांनी,माणसासाठी. मानवी मेंदूचा ,आणि त्या प्राप्त ज्ञानाचा वापर खितपत पडलेल्या माणसासाठी करणे म्हणजे खरा ज्ञानप्रसार होय

भारतात जन्मलेल्या संताना गुरूना,सम्राटांना,महापुरुषांना, महानायक,नायक नायिका यांना असेच वाटत होते. त्यांनी त्यांचे जीवन चंदनासारखे झिजविले.अहोरात्र ज्ञानाचा प्रचार प्रसार केला मानवी मुल्य जोपासली , भारतीय समाजात एक भाईचारा निर्माण करून चांगले विचार आणि तत्वज्ञान पेरले.तीच बीरुजक न्यायतत्वे आणि प्रातिनिधिक नेतृत्व आणि कर्तृत्व त्यासाठीच संविधानीक तरतूद भारतीय घटनेच्या शिल्पकारांनी अथक प्रयत्न आणि खस्ता खाऊन मेहनत करून तुम्हा आम्हा बहाल केलीत. हे विसरता कामा नव्हे. त्यामुळेच आज आपल्या मानवी जीवनाला अर्थ प्राप्त झाला.आपल्या कित्येक पिढ्या आणि पूर्वजांना आणि त्यांच्या मानवी जिवनाला ज्या व्यवस्थेन, जखडून ठेवले त्या साखळयावर घण घातलेच पाहिजेत.दिल्लीतील जंतरमंतरवर लोकशाही मार्गाने सत्तारूढ पक्षाच्या बळाच्या वापरास न जुमानता ,नेटाने जीवाची पर्वा न करता विद्यार्थी वर्गाने अभिजित दिपकेच्या नेतृत्वात जे जनआंदोलन केले . रास्त मागण्यास्तवे काही मुलांचे त्यात प्राणही गेले.अमानुषपणे दिल्ली पोलिसांनी कोवळ्या वयातील मुलांना ,मुलींना रक्तबंबाळ केले.हे अख्या जगाने दूरचित्रवाणी आणि समाज माध्यमावर बघितले. शांततेने जंतर मंतरवर झालेल्या विद्यार्थी आंदोलनास एक सरकारच्या नाकर्तेपणामुळे आणि वेळीच दखल न घेतल्यामुळे , बलामुळे मुलांचा उद्रेक आणि घडलेल्या परीक्षा घालमेळामुळे साहजिक होता . त्यात जेन झी ची भूमिका सत्याची बाजू मांडून महत्त्वाची आहे.न घाबरता सत्य भूमिका मांडून जगापुढे प्रसार सत्यता मांडून ऐतिहासिक नोंद केली.बाकीचे प्रसारमाध्यम ही खोटी आणि विकाऊ झाली हेही सिद्ध केले.उपेक्षितांचे अंतरंग उघडे करून समाजापुढे ठेवले पाहिजेत . आत्मसंतुष्ट समाजाला अपराधीत्वाची जाणीव करून दिली पाहिजे विचाराचा दीप लावून कृती करणे नव्या विचाराचा प्रकाश अंतकरणातील पटलावर पाडून जीवनाच्या उदात्त प्रकाश क्षितिजाचे दर्शन घेऊन त्या दिशेने वाटचाल करणे सर्व समाजाच्या दृष्टीने हितावह आहे .समाजातील चुकलेल्या या दुष्ट समाजाला एक ना एक दिवस या दिशेने वाटचाल करावीच लागेल .सत्य समजून उमजून आज ना उद्या त्या दिशेने नवयुवक वाटचाल करतील, कोंबडं किती दिवस कुल्याखाली डाळून ठेवणार,दिवस उजाडेल, सूर्य झाकला जात नसतो.असा आजही अभ्यासू सखोल अशा मर्मभेदी मंडळीस आत्मविश्वास वाटतो. बुरसटलेल्या विचाराच्या जंजाळातून समाजाला काही दिवसांनी ,विचारांती नवयुवक बाहेर काढतील. व्यक्तीच्या उन्नतीपेक्षा समाजाची उन्नती महत्त्वाची आहे .ज्या दिवशी त्यांना कळेल तो दिवस कुळभुषणवाडी गोप्रतीपालक राजे छत्रपतीच्या राज्यभिषेक दिवसारखाच ठरेल.ज्याच्या मनात समाजात राहून आपली उन्नती करून घ्यावी अशी उत्कट इच्छा आहे त्यांनी अगोदर समाजाची उन्नती करण्याचा आटोकाट प्रयत्न केला पाहिजे. समाजाचां स्थर जसा खाली खाली जात असेल, तर त्यां समाजाचा नेता वर येणे शक्य नाही हे अंतिम सत्य असेल.*त्यांना एक दिवस मानवतावादी दृष्टी ठेवून समतेची व विज्ञानवादाची पेरणी करावीच लागेल.जीवनाच्या अंतिम आणि शेवटच्या क्षणी आपली स्वतःची बुद्धी हीच नितीमूल्याची निकष ठरवण्यासाठी सर्वश्रेष्ठ मार्गदर्शक असते. आचारनाची इष्ट, निष्टता ठरवण्यासाठी बुद्धी हेच एकमेव प्रमाण आहे. आता बुद्धीला अगम्य वाटणाऱ्या घटना बुद्धीच्या प्रयोगशील वृत्तीनेच हळूहळू उलगडू शकतील .विज्ञानाच्या प्रगतीमुळे जुन्या ग्रंथाचे प्रमान्य नष्ट झाले आहे पुढेही होणार आहेच.जुनी समाज रचना लवकरच कोलमडेल. कितीही उत्साह केले ,अमाप राजकीय रसद पुरवून आणि धांगडधिंगा करून लोकांना आकर्षित केले तर ते काही दिवस लोक पचवीतील आणि त्यांच्यातील उद्रेक आणि विवेक जागृत होईल. , एवढं नक्की आहे. तलवारी सारख्या शस्त्रांचे मर्मापर्यंत चराचर कापीत जाणे ,आणि फक्त अंगाला चाटणे हा जो फरक आहे. तो प्रत्यक्ष सुखदु:खात आणि त्याच्या चित्रात मनात अधोरेखंकीत होईल.. आज असंख्य लोक,जत्थे, युवक युवती मन फोटोग्राफ घेण्यासाठी तयार केलेल्या भिंगाप्रमाणे आहेत .कल्पना आणि विचार प्रज्वलित होऊन कल्पना विशेषी तामतत्वित होणे. यातच आजच्या नवयुवक युवतीचा आनंद आहे अहोटी संभव आहे.एक खोटं लपविण्यासाठी हजार वेळा खोटं बोलून चालणार नाही.हे मानवी स्वभावाचे निसर्ग सृष्टीचे यथार्थ दर्शन घडविते. जागृत वस्तीतील मनाचा जो व्यापार चालतो, त्यांनी संवेदना, इच्छा व ज्ञान या वर्गात त्यांना काही दिवस विभाजन करता येइल, पण काही दिवसांनी मानवी मनाची रचना अंतकरणाला हात घालत असते. मृदता किंवा रमणीयता हा ह्या गुणाचा प्रधान गुण असतो. मन सदैव सुखद दु:खद संवेदना निर्माण करते .सरस नीरस समजते प्रतिभेच्या साह्याने मनातील मर्म हे जन्म ते मनुष्याच्या दु:खाचा परिहार व सुखाची वृद्धी करण्याचे सामर्थ्य हे मनात आहे .ज्ञान हे सुखाचे मुख्य साधन आहे .मनातील जे सत्य मांडायचे असते, त्याची निवड करताना मनात असंख्य तरंग लाटा निर्माण होऊन , त्यासाठी खूप मेहनत आणि सायास पडतात वेळ लागतो पण सत्य उलगडते .दुष्काळात अन्न न मिळाल्यामुळे होणाऱ्या यातनाचा अनुभव आणि त्या यातनाचे वर्णनाचे वाचन किंवा श्रवण यात खूप अंतर आहे.तसे आज भारतीय समाजाचे चित्र आहे.एक दिवस असा येईल,विचार करावाच लागेल....*म्हणूनचबाप्पा घटनाकारा! !!नसता जन्माला.तर ,जगलो असतो, आम्ही!!! खरकट्यावर.वाळल्या कुटक्यावर.मनुचा बैल होऊन राबलो. असतो, धुऱ्यावर.तळपत्या उन्हात.चहा विकणे सोडा, प्राण्यागत उदासारखे अंधाऱ्या अन् आतून पोखरलेल्याअन् पोकळ झालेल्या,जीर्ण पडक्याझाडाच्या ढोलारीत.चुपचाप!!.धर्माच्या ठेकेदारांनीदिलाच , नसता वाव अन् प्रवेश अयोध्येत .फुशारकी मारण्यासाठी. रबरी शिक्का नेतृत्व लाभी मुर्मू मॅडम सारख.बुक्क्यांचा मार सहन करीतमुकाट्याने अन् निपुटपणे हे जिने...या मानवतेच्यादृष्टिकोनातून रचित संविधानिक प्रातिनिधिक युगात...... फक्त आणि केवळ पदासाठीच का?का सार्थ जीवनासाठी.

**मधुबानंदा प्रधान,**
**अकोला**

# योगेश वगदे यांना भूशास्त्रात पीएच.डी.



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने योगेश वगदे यांना भूशास्त्र विषयात पीएच.डी. पदवी प्रदान केली. त्यांनी हे संशोधन देवगिरी महाविद्यालयाच्या डॉ. रंजना गावंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करण्यात आले. या संशोधनात वाशिम जिल्हयातील पेनगंगा नदी खोऱ्यातील भूजल संभाव्यता, भूजल संसाधने, जलसंधारण व कृत्रिम पुनर्भरणासाठी योग्य क्षेत्रांचा अभ्यास करण्यात आला. शाश्वत भूजल व्यवस्थापन आणि भविष्यातील जलनियोजनासाठी संशोधनातील निष्कर्ष उपयुक्त ठरणार आहेत. पीएच.डी. पदवी प्राप्त केल्याबद्दल योगेश वगदे यांचे प्राचार्य, मार्गदर्शक, शिक्षक, सहकारी, मित्रपरिवार व कुटुंबीयांनी अभिनंदन केले.

**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.**
**कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.**
**संपर्क क्र. 7588005002**




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २५ सप्टेंबर २०२६


## जुनी पेन्शन आंदोलन आचारसंहितेमुळे तूर्तास स्थगित

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन समन्वय संघाच्या वतीने १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त व त्यानंतर १०० टक्के अनुदानावर आलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याच्या मागणीसाठी दि.२८ सप्टेंबर २०२६ पासून आझाद मैदान, मुंबई येथे प्रस्तावित करण्यात आलेले धरणे आंदोलन राज्यातील शिक्षक व पदवीधर मतदारसंघांच्या निवडणुकीमुळे लागू झालेल्या निवडणूक आचारसंहितेच्या पार्श्वभूमीवर तूर्तास स्थगित करण्यात आले आहे.मंगळवार, दि.२२ सप्टेंबर रोजी कोकण विभाग शिक्षक मतदारसंघाचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे आणि मराठवाडा शिक्षक मतदारसंघाचे आमदार विक्रम काळे यांनी जुनी पेन्शनच्या प्रश्नासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतल्याचे समन्वय संघाने सांगितले. आचारसंहितेमुळे सध्या निर्णय घेण्यात अडचणी असून, आचारसंहिता संपल्यानंतर या प्रश्नावर निर्णय घेण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिल्याचे संघाकडून सांगण्यात आले आहे.या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन समन्वय संघाच्या समन्वयकांमध्ये आंदोलनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. आचारसंहितेची परिस्थिती लक्षात घेऊन २८ सप्टेंबरपासून सुरू होणारे धरणे आंदोलन काही काळासाठी स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला.दरम्यान, जुनी पेन्शनच्या मागणीसाठी आमदार, खासदार व मंत्र्यांकडून शिफारसपत्रे घेणे, त्यांची सुस्पष्ट PDF तयार करून राज्य समन्वय संघाच्या माध्यमातून मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांना ई-मेल तसेच रजिस्टर पोस्टाद्वारे पाठविण्याची कार्यवाही सुरूच ठेवण्यात येणार आहे. तसेच इच्छामरणाची परवानगी मागणारे पत्र पाठविण्याची कार्यवाहीही सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.निवडणूक आचारसंहिता संपल्यानंतर समन्वय संघाकडून मुख्यमंत्री कार्यालयाकडे तातडीने पाठपुरावा करण्यात येणार असून, त्यानंतर एक-दोन आठवड्यात ठोस निर्णय न झाल्यास स्थगित केलेले धरणे आंदोलन नव्या तारखेसह पुन्हा सुरू करण्याचा निर्धार संघाने व्यक्त केला आहे.हे आंदोलन कोणत्याही दबावाला किंवा आमिषाला बळी पडून स्थगित केलेले नसून, निवडणूक आचारसंहितेची परिस्थिती लक्षात घेऊन तसेच मुख्यमंत्र्यांकडून देण्यात आलेल्या आश्वासनाच्या पार्श्वभूमीवर सदस्यांचा वेळ, पैसा आणि ऊर्जा यांचा अनावश्यक खर्च टाळण्यासाठी सर्वांच्या संमतीने तूर्तास स्थगित करण्यात आल्याचे महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन समन्वय संघाने स्पष्ट केले आहे.

## प्रा. डॉ. हेमंत वर्मा यांना 'मराठवाडा खेळरत्न पुरस्कार' घोषित



**जालना (प्रा डॉ राजेंद्र सोनवणे) :** जे ई एस महाविद्यालय जालना येथील क्रीडा विभाग प्रमुख प्राध्यापक डॉ.हेमंत वर्मा यांना महाराष्ट्र लोकशाही पत्रकार संघटनेतर्फे नुकताच 'मराठवाडा खेळ रत्न 'हा पुरस्कार जाहीर झाला आहे. त्यांनी धनुर्विद्या या खेळात उल्लेखनीय कामगिरी बजावली असून ते उत्तम प्रशिक्षक म्हणून कार्यरत आहेत, आतापर्यंत त्यांच्या अनेक खेळाडूंनी राष्ट्रीय व आशियाई स्पर्धांमध्ये सहभागी होऊन मेडल्स मिळवले आहेत. मराठवाड्यात धनुर्विद्या या खेळाचा प्रचार आणि प्रसार करण्याचे कार्य त्यांनी केलेले आहे, जे ई एस महाविद्यालयात त्यांनी क्रीडा विषयक राष्ट्रीय चर्चासत्र ही घेतलेले आहेत. प्रा. डॉ. हेमंत वर्मा यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू घडवले असून ,त्यांच्या या कामगिरीबद्दल त्यांना 'मराठवाडा खेळ रत्न' हा पुरस्कार देण्यात आला आहे. ते स्वतः धनुर्विद्या या खेळात तरबेज असून त्यांनी राष्ट्रीय स्तरावर विशेष प्राविण्य मिळवलेले आहे, या खेळाचे उत्तम प्रशिक्षक म्हणून त्यांचा नावलौकिक आहे.याबद्दल त्यांचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, उपप्राचार्य डॉ.उमेश मोगले, प्राध्यापक डॉ. दिलीप अर्जुने, धनुर्विद्या संघटनेचे मानद जिल्हाध्यक्ष प्रा.डॉ.राजेंद्र सोनवणे. डॉ.नागनाथ शेवाळे, प्रा. राहुल सारस्वत, डॉ. किशोर बीरकायलु, श्री. अजय कुलकर्णी, श्री. विलास बोधले आधी तसेच शिक्षक व शिक्षक तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे. जालना जिल्ह्यातील राष्ट्रीय खेळाडू तन्मय अग्निहोत्री,व नामवंत प्रशिक्षक श्री प्रकाश दुसेजा, श्री. सुजित टेकूर, आदींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेत ज्ञानेश्वर विद्यालयाचे घवघवीत यश



**छत्रपती संभाजीनगर :** जिल्हा क्रीडा कार्यालय, छत्रपती संभाजीनगर आणि महानगरपालिका हद्दीतील शाळांच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेत विवेकानंद शिक्षण संस्था संचलित, ज्ञानेश्वर विद्यालय, बेगमपुरा या शाळेने दमदार कामगिरी केली आहे.या स्पर्धेत शाळेचा इयत्ता दहावी 'क' चा विद्यार्थी योग श्रीपाद कुलकर्णी याने नेत्रदीपक यश संपादन केले आहे.- ५० मीटर फ्रीस्टाइल - द्वितीय क्रमांक - सिल्वर मेडल 🥈- १०० मीटर फ्रीस्टाइल - द्वितीय क्रमांक - सिल्वर मेडल 🥈- ५० मीटर बॅक स्ट्रोक - द्वितीय क्रमांक - सिल्वर मेडल 🥈योगच्या या घवघवीत यशाबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका डॉ. संध्या मोरे मॅडम यांनी त्याचे विशेष अभिनंदन केले.याप्रसंगी शाळेचे ज्येष्ठ शिक्षक श्री. काकडे सर, पर्यवेक्षक श्री. तांगडे सर, वर्गशिक्षक श्री. ढगे सर, ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती पवार मॅडम, सुलताने मॅडम, बिरोटे मॅडम, महाजन मॅडम, श्री. अधाने सर, श्री. झोडपे सर, वाघमारे सर, देगलूरकर सर, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी खेळाडूचे मनस्वी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या

## कन्नड तालुका दुष्काळग्रस्त जाहिर करा एमआयएम ची मागणी



**कन्नड (अरुण थोरात) :** कन्नड तालुका दुष्काळग्रस्त जाहिर करून शेतकऱ्यांना दुष्काळग्रस्त निधी तात्काळ देण्याची मागणी एमआयएम पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे. यां बाबत तहसीलदार कन्नड यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, संपूर्ण महाराष्ट्र आणि विशेष करून मराठवाडा व संभाजीनगर जिल्ह्यासह कन्नड तालुक्यात सरासरीपेक्षाही अत्यल्प प्रमाणात पाऊस झाल्यामुळे कन्नड तालुक्यातील शेतकरी वर्ग हवालदिल झाला आहे. शेतकऱ्यांनी पेरलेले मका, कापूस, उडीद, तूर, भुईमूग इत्यादी पिके पावसाअभावी पूर्ण सुकून गेले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे वर्षभराचे बजेट पूर्णपणे कोलमडले आहे. शेतकऱ्यांवर कर्जबाजारी व उपासमारीची वेळ आली आहे. जनावरांसह आपल्या परिवाराची पाण्यासाठी मोठी टंचाई निर्माण झाली आहे. तालुक्यात गेल्या दोन महिन्यापासून पावसाचा खंड पडल्यामुळे तालुक्यातील मका, कापशी, तूर व इतर पिकांची वाढ खुंटली आहे. त्यामुळे शेतकरी हवालदिल झालेला आहे. विषयावर जातीने लक्ष घालून तात्काळ कन्नड तालुका दुष्काळग्रस्त म्हणून घोषित करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी, अन्यथा एआयएम पक्ष आणि शेतकऱ्यांमार्फत आपणांविरुद्ध तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. असे निवेदनात म्हटले आहे. यावेळी पक्षाचे तालुकाध्यक्ष नासेर पटेल, शहराध्यक्ष रईस भाई पवार, तालुका सचिव आबेद भाई पिंजारी, तालुका उपाध्यक्ष अशफाक मजिद शेख, मौलाना आलीम साहब, आरेफ कुरैशी, मतिन पवार यांची उपस्थिती होती


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २५ सप्टेंबर २०२६


## फक्त एवढंच कर!

आता फक्त एवढंच कर,
तरुणांना दे बुद्धी डोळस.
सदा ठेव कामात व्यस्त,
पळून जाऊ दे आळस. १

मार्ग यशाचा दाव त्यांना,
संकटांशी लढता लढता.
सन्मार्गी लावून तरुणांना,
सदा वाचवावे पडता पडता. २

राजकारणांना बुद्धी द्यावे
सदा करण्यास समाजसेवा
पळणार नाहीत प्रसिद्धी मागे
मिळो आशीर्वाद रुपी मेवा. ३

टिकवून ठेवतील मराठी शाळा,
सुबुद्धी द्यावे सर्व पालकांना.
मराठीच्या शाळेत टाकतील,
आपल्या लाडक्या बालकांना. ४

जमलंच तर बाप्पा जगातला,
वाढता भ्रष्टाचार तेवढे बंद कर.
गोर गरिबांना न्याय देतांना,
अनाथ हतबल अपंगांचे पोट भर.५

आता शेवटी बाप्पा एक कर,
महागाईला तेवढं आवर घाल.
राबत्या हातांना यश देऊन,
शेतात पिकू दे भरपूर माल. ६



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

# तालुकास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेतील कुस्ती स्पर्धेचा उत्साहात शुभारंभ!



**कन्न्ड :** सन २०२६-२७ च्या तालुकास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेतील कुस्ती स्पर्धेचा आज उत्साहात शुभारंभ करण्यात आला. यावेळी १४, १७ व १९ वर्षांखालील मुलांच्या कुस्ती सामन्यांना सुरुवात झाली.उद्घाटनप्रसंगी उपस्थित मान्यवरपोलीस उपअधीक्षक आरती पवार पोलीस निरीक्षक सतीश दिंडे, गटशिक्षणाधिकारी मनीष दिवेकर, क्रीडा संयोजक मुक्तानंद गोस्वामी, क्रीडा मार्गदर्शक प्रवीण शिंदे व अविनाश काळे यांची प्रमुख उपस्थिती होती.तसेच श्याम खोसरे कडूबा चव्हाण, सचिन शेळके व भगवान म्हैसमाळे यांचे सहकार्य लाभले.कुस्ती सामन्यांचे परीक्षण पंच गोपाल बमनावत यांनी केले.या कुस्ती स्पर्धेत १४, १७ व १९ वर्षांखालील सर्व गटांत मिळून एकूण ९४ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. मार्गदर्शनपोलीस उपअधीक्षक आरती पवार मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना खेळामध्ये जिद्द, मेहनत, शिस्त आणि क्रीडावृत्तीचे महत्त्व सांगितले. पोलीस निरीक्षक सतीश दिंडे यांनीही खेळाडूंना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण शिंदे यांनी केले, तर आभार प्रदर्शन करण राठोड यांनी केले.१४ वर्षांखालील गटातील प्राथमिक निकाल ३५ किलो वजन गट – वसंत चव्हाण, साने गुरुजी विद्यालय, कन्नड ३८ किलो वजन गट – हेमंत विठ्ठल राठोड, नवजीवन आश्रमशाळा, आंबा तांडा ४४ किलो वजन गट – प्रेम किरण इंगळे, कर्मवीर काकासाहेब देशमुख विद्यालय ४८ किलो वजन गट – अर्जुन गणेश नरोटे, श्री गणेश विद्यालय, देवगाव रंगारी


प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103


# राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त भूममध्ये रक्तदान शिबिर; ३१ रक्तदात्यांचा उत्स्फूर्त सहभाग




**भूम :** शंकरराव पाटील महाविद्यालय, भूम येथे राष्ट्रीय सेवा योजना दिन उत्साहात साजरा करण्यात आला. राष्ट्रीय सेवा योजना दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. भगवंत ब्लड बँक, बार्शी यांच्या सहकार्याने आयोजित या शिबिरास विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता,यावेळीकार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अनुराधा जगदाळे होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून भगवंत ब्लड बँक, बार्शीचे श्री. गणेश जगदाळे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना रक्तदानाचे महत्त्व, रक्तदानाविषयी असणारे गैरसमज आणि रक्तदानामुळे गरजू रुग्णांना होणारी मदत याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, सेवाभाव आणि समाजाप्रती असलेली जबाबदारी यांची जाणीव निर्माण करण्याचा संदेश देण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. काळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. अमोल कुटे यांनी केले.यावेळी प्रा. बोराडे सर, डॉ. सुरवसे प्रा. नंदू जगदाळे, प्रा. मंगेश खराटे, डॉ. नितीन पडवळ, प्रा. पवार, डॉ गायकवाड, यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ह्यामध्ये ३१ रक्तदात्यानी रक्तदान केले."रक्तदान हे श्रेष्ठदान असून, आपल्या रक्ताच्या एका थेंबामुळे एखाद्याचे जीवन वाचू शकते," या सामाजिक संदेशातून राष्ट्रीय सेवा योजना दिनाचा उपक्रम उत्साहात संपन्न झाला.


प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २५ सप्टेंबर २०२६


## माधवराव पाटील महाविद्यालयात राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वाद-विवाद स्पर्धा उत्साहात संपन्न




***फोटो ओळ : मुरूम, ता. उमरगा येथील माधवराव पाटील महाविद्यालयात आयोजित वादविवाद स्पर्धेच्या प्रमुख अतिथी प्रा. किरण सगर बोलताना चंद्रकांत बिराजदार, रमेश चव्हाण, गणेश अंबर, सतीश शेळके व अन्य.***

**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** आजचा युवक हा सशक्त विचाराने परिपूर्ण असला पाहिजे. विद्यार्थ्यांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य असलेच पाहिजे, परंतु स्वातंत्र्याचा अर्थ काहीही करणे असा होत नाही. माणूस म्हणून जगताना स्वातंत्र्य, राष्ट्रीय एकात्मता, निसर्ग संवर्धन आणि माणुसकी जोपासणे हेच खऱ्या अर्थाने तरुण पिढीचे कर्तव्य असल्याचे प्रतिपादन प्रा. किरण सगर सर यांनी केले. युवकांसाठी आयोजित वादविवाद स्पर्धेत ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.सध्या सोशल मीडियावर पसरणाऱ्या उलट-सुलट चर्चा, गैरसमज आणि अफवांकडे तरुणांनी दुर्लक्ष केले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले. चुकीच्या गोष्टींचे अनुकरण न करता चांगल्या विषयांवर चर्चा आणि मंथन झाले पाहिजे, यावर त्यांनी भर दिला. आंदोलन करताना संविधानाचे भान असावे,युवकांनी आपली भूमिका नेहमी संविधानिक चौकटीतच मांडली पाहिजे. आंदोलने किंवा निदर्शने करताना विवेकी विचार करून सार्वजनिक मालमत्ता, पर्यावरण, सांस्कृतिक पर्यावरण आणि निसर्गाचे संवर्धन केले पाहिजे, अशी भूमिका भावना त्यांनी मांडली. आंदोलने करतानां कधीही आपला विवेक ढळू दिला नाही पाहिजे, असे ठाम मत मांडत पुढे म्हणाले की,युवा वर्ग हा देशाचा भविष्याचा आधारस्तंभ आहे. युवकांनी सत्य, लिखाण स्वातंत्र्य, चांगली भाषणे आणि अधिकारांचा पुरेपूर वापर करतानाच विरोधकांच्या विचारांना देखील समजून घेतले पाहिजे. जीवनात वाटचाल करताना नेहमी सकारात्मक व नकारात्मक दोन्ही बाजूंचा विचार करून सकारात्मक दृष्टिकोनाने पुढे गेले पाहिजे, हाच उदात्त दृष्टिकोन माधवराव पाटील काकांनी जोपासला असल्याचे गौरवउद्गार काढत त्यांनी, असा मौलिक संदेश त्यांनी शेवटी दिला.माणूस म्हणून जगताना स्वातंत्र्य, राष्ट्रीय एकात्मता, निसर्ग संवर्धन आणि माणुसकी जोपासणे हेच खऱ्या अर्थाने तरुण पिढीचे कर्तव्य असल्याचे प्रा. किरण सगर यांनी स्पष्ट केले.नगर शिक्षण विकास मंडळ, मुरूम संचलित श्री माधवराव पाटील महाविद्यालयाच्या वतीने महाविद्यालय वर्धापन दिनाचे औचित्य साधून २५ वी 'राज्यस्तरीय अंतरमहाविद्यालयीन वाद-विवाद स्पर्धेचे' आयोजन गुरुवारी (ता. २४) रोजी महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात करण्यात आले. उद्घाटन दीपप्रज्वलन व माधवराव पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण उपनगराध्यक्ष रमेश चव्हाण यांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार होते. प्रमुख अतिथी अखिल भारतीय साहित्य महामंडळाचे माजी केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रा. किरण सगर, उपनगराध्यक्ष रमेश चव्हाण, संस्थेचे संचालक प्रा. डॉ. सतीश शेळके, नगरसेवक गणेश अंबर, माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. महेश्वर होगाडे, परीक्षक प्रा. डॉ. अनिता मुदकण्णा, प्रा. डॉ. लक्ष्मण बिराजदार, प्रा. डॉ. सन्मुख मुच्छट्टे, प्रा. डॉ. सायबण्णा घोडके, समन्वयक प्रा. गोपाळ कुलकर्णी आदींची प्रमुख उपस्थिती होती. "आधुनिक भारताचा विकास आणि पर्यावरण संरक्षण यांच्यात समन्वय आहे/नाही" हा या स्पर्धेचा मुख्य विषय होता. याप्रसंगी आदर्श शिक्षक प्रा. डॉ. नरसिंग कदम तर आदर्श शिक्षकेत्तर कर्मचारी वीरभद्र बरबडे यांचा मानपत्र, शाल, पुष्पहार देऊन मान्यवरांच्या हस्ते येथे सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. महेश मोटे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. सुभाष हुलपल्ले आभार प्रा. डॉ. राम बजगिरे यांनी मानले. यावेळी विविध शाखेचे विद्यार्थी-विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होत्या.

## राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन मोठ्या उत्साहात साजरा




**मुरूम (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** भारत शिक्षण संस्था, उमरगा संचलित कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, मुरूम येथे राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन व उद्घाटन शिबिर मोठ्या उत्साहात साजरे करण्यात आले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. गोविंद इंगोले होते. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक प्रा. मनोज गायकवाड, तर प्रमुख उपस्थिती म्हणून प्रा. किसन माने व प्रा. सुजित चिकुंद्रे प्रा भगवान चौगुले उपस्थित होते.राष्ट्रीय सेवा योजना ही विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, राष्ट्रप्रेम, सेवाभाव व नेतृत्वगुण विकसित करणारी महत्त्वपूर्ण योजना आहे. विद्यार्थ्यांनी समाजाच्या विकासासाठी सक्रिय सहभाग नोंदवावा, तसेच सेवा, समर्पण आणि परिवर्तन या मूल्यांचा अंगीकार करावा, असे मत प्रमुख मार्गदर्शक प्रा. मनोज गायकवाड यांनी व्यक्त केले.अध्यक्षीय समारोपात प्राचार्य गोविंद इंगोले यांनी "मी नाही, तर तुम्ही" या वाक्यातील व्यापक विचार विद्यार्थ्यांसमोर मांडला. स्वतःपुरते न जगता समाजासाठी काहीतरी करण्याची भावना प्रत्येकाच्या मनात निर्माण करणे, हे राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. सेवा ही केवळ कृती नसून ती एक भावना आहे. समाजासाठी जगणे हीच खरी राष्ट्रीय सेवा आहे, असे प्रतिपादन त्यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना केले.कार्यक्रमाचे आयोजन व यशस्वी नियोजन कार्यक्रम अधिकारी प्रा. गजानन उपासे व प्रा. प्रसाद इंगोले यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, स्वयंसेविका तसेच शिक्षकवृंद उपस्थित होते.राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक कार्याची प्रेरणा निर्माण झाली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी. व्ही. मोरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन आय. पी. चौधरी यांनी मानले.

## जि.प.प्राशा.रेलतांडा येथे सेवासंकल्प अभियान उपक्रम संपन्न



**कन्नड (अरुण थोरात) :** जि प प्रा शा रेलतांडा केंद्र कन्नड नं. १ येथे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त दि.२४ सप्टेंबर रोजी सेवा संकल्प अभियान, पौष्टिक पोषण आहार, विविध भाजीपाला, कडधान्य फळभाज्या, व फळे ऋतुमानानुसार आहार याविषयी प्रात्यक्षिकातून माहिती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक श्री आहिरे, अंगणवाडी पर्यवेक्षिका श्रीमती दळवी, व मराठवाडा ग्रामीण विकास संस्थेचे कामेश गवळी, स्वराज राठोड यांनी मार्गदर्शन केले. अंगणवाडी कार्यकर्ती चंद्रकला थेटे, मदतनीस मंगल चव्हाण, व गावातील माता-पालक महिला स्तनदा माता व गर्भधर मातांची उपस्थिती होती. श्री अनवडे यांनी सखी सावित्री समितीच्या बैठकीत मार्गदर्शन केले. राज्यस्तरीय सुलभक शाळा( SRG) मूल्यवर्धन उपक्रम घेण्यात आला. याप्रसंगी शिक्षक विकास डोंगरदिवे, वैशाली जैन (वाळली) यांनी मूल्यवर्धन कार्यक्रमावर मार्गदर्शन केले. उपस्थित सर्व पालक माता-भगिनी विद्यार्थ्यांना, संस्कार व मूल्यवर्धन उपक्रमाचे महत्त्व समजून सांगितले. याप्रसंगी गावातील भीमा पवार, नागेश्वर पवार, गणेश राठोड, ऊसतोड कामगारांचे अध्यक्ष युवराज पवार, तसेच जिजाबाई पवार, रुक्मणबाई राठोड, मिराबाई पवार, चंद्रकलाबाई, रुक्मणबाई राठोड, नीतू कल्पेश चव्हाण, सोनालीबाई राठोड, इत्यादी महिला व पुरुष उपस्थित होते. शेवटी श्री आहिरे यांनी महिला भगिनी व गावातील उपस्थित मंडळीच्या आभार मानले. व वंदे मातरम ने कार्यक्रमाचा समारोप केला.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २५ सप्टेंबर २०२६


## पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालयात वाणिज्य मंडळाचे उद्घाटन



**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** अजिंठा शिक्षण संस्था संचलित पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालय येथे शैक्षणिक वर्ष 2026-27 साठी वाणिज्य मंडळाचे उद्घाटन नुकतेच उत्साहात संपन्न झाले.वाणिज्य मंडळाचे उद्घाटक म्हणून यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, सिल्लोड येथील वाणिज्य विभागाचे डॉ. डी. आर. पानझडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वाणिज्य शिक्षणात बदलत्या काळानुसार अनेक संधी उपलब्ध होत आहेत. विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी अभ्यासावर अवलंबून न राहता कौशल्यविकास आणि व्यावसायिक दृष्टिकोन ठेवून विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवावा, जेणेकरून त्यांचे व्यक्तिमत्त्व विकास साधता येईल. वाणिज्य मंडळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी व्याख्याने, कार्यशाळा, विविध स्पर्धा, औद्योगिक भेटी, करिअर मार्गदर्शन व कौशल्यविकासाचे उपक्रम वर्षभर आयोजित केल्याने विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो. यावेळी महाविद्यालयाचे इतिहास विभाग प्रमुख डॉ भास्कर टेकाळे म्हणाले, वर्गामध्ये आपण जे शिकतो, ते प्रत्यक्ष जीवनाशी जोडण्याचे काम हे मंडळ करू शकते. वाणिज्य मंडळ हे केवळ कार्यक्रमांचे व्यासपीठ न राहता विद्यार्थ्यांच्या कल्पनांना दिशा देणारे व्यासपीठ झाले पाहिजे.वर्गात मिळणारे ज्ञान विद्यार्थ्याला पदवी देते; पण व्यवहारातून मिळणारे ज्ञान त्याला दिशा देते.अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. पंडित नलावडे यांनी विद्यार्थ्यांनी बदलत्या काळाची गरज ओळखून आवश्यक अशी कौशल्ये आत्मसात करावीत आणि पुस्तकी ज्ञानाचा व्यावहारिक जीवनात प्रभावी उपयोग करावा, असे आवाहन केले.डॉ. एल. जी. कुरपटवार यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विरेंद्र सुरासे यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. किशोर लोखंडे यांनी मानले. या कार्यक्रमाला डॉ. जे. एल. अधाने, प्रा. कौसर शेख, प्रा. प्रफुल देवरे, डॉ भा. ना. गाडेकर, डॉ. पी एन डाबके, प्रा वंदना कदम, प्रा. गोविंद फड यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा ५७ वा वर्धापन दिन उत्साहात



**छत्रपती संभाजीनगर :** अजिंठा शिक्षण संस्था संचलित पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे ५७ वा वर्धापन दिन - २०२६ ध्वजारोहण समारंभ संपन्न महाविद्यालयातील प्र. क्रीडा संचालक डॉ. प्रो. दिगंबर गंगावणे यांच्या हस्ते संपन्न झाला याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पंडित नलावडे उपस्थित होते. नंतर राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवक विद्यार्थ्यांकरीता 'राष्ट्रीय सेवा योजना व स्वयंसेवकाचे कार्य' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते, या व्याख्यानाचे प्रमुख व्याख्याते म्हणून यशवंतराव चव्हाण महाविद्यालय सिल्लोड येथील वाणिज्य विभाग प्रमुख व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. डी .आर पानझडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले ते बोलताना म्हणाले, की विद्यार्थ्यांच्या सर्व कलागुणांना व्यक्त होण्याचे व्यासपीठ म्हणजे राष्ट्रीय सेवा योजना आहे . २४ सप्टेंबर १९६९ रोजी म. गांधीच्या जन्मशताब्दी वर्षांमध्ये पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या संकल्पनेतून झाली . महाविद्यालयीन तरुण-तरुणींना सामाजिक कार्यात सक्रिय करून घेण्यासाठी या योजनेची स्थापना झाली असल्याचे त्यांनी आपल्या भाषणात सांगितले सुरुवातीला ३७ विद्यापीठापासून सुरू झालेल्या या योजनेची सद्यस्थितीला देशातील ५०० विद्यापीठात व १२००० माध्यमिक विद्यालय यातून ४० लाखाहून अधिक सक्रिय स्वयंसेवक सहभागी असल्याचे त्यांनी सांगितले. भारत सरकारच्या युवा व क्रीडा मंत्रालयाद्वारे चालवली जाणारी ही जगातली एकमेव अशी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरीता कार्य करणारा विभाग असल्याचे आपल्या भाषणात ते म्हणाले. राष्ट्रीय सेवा योजना हे स्वयंसेवकाच्या जीवनामध्ये परिवर्तन घडवणार एक महत्त्वपूर्ण असे माध्यम आहे .जीवन कसे जगावे ,जीवन सामान्य जगावे की खास जगावे की विशेष जगावे की आनंदी जीवन कसे जगावे याविषयी देखील त्यांनी सखोल मार्गदर्शन केले. समाजात घडणाऱ्या विविध बदलांचा विद्यार्थ्यांनी जवळून अभ्यास केला पाहिजे व आपण या समाजाचे एक जबाबदार नागरिक असून देशाचे आधारस्तंभ असल्याचे व आपल्या शेजारी आपल्या कुटुंबात व आपल्या परिसरात स्वच्छता पाळणे व जागृती पर कार्यक्रम यामध्ये सहभागी होणे. वृक्षारोपणामध्ये सहभागी होणे. नशामुक्त अभियानाला देखील विद्यार्थ्यांनी सक्रियरित्या पाठिंबा द्यावा असे त्यांनी आपल्या मार्गदर्शन पर भाषणात सांगितले. या कार्यक्रमात शेवटी विद्यार्थ्यांनी विकसित भारतासाठी नशामुक्त युवा या भारताचे पंतप्रधान मा. श्री. नरेंद्र मोदी यांच्या "२०४७ विकसित भारत" या संकल्पनेतला एक भाग म्हणून तरुणांनी जास्तीत जास्त संख्येने नशा मुक्त अभियानामध्ये सहभागी व्हावे व आपले कुटुंब, आपले गाव, आपला समाज , आपल राज्य आपला देश हे नशा मुक्त झाला पाहिजे या संकल्पनेतून आज राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे विद्यार्थ्यांना नशा मुक्त युवा व विकसित भारत यांची शपथ देण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष अध्यक्ष पद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पंडित नलावडे यांनी भूषवले या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील डॉ.भा .ना गाडेकर डॉ.पांडुरंग डापके डॉ. ज्योती आदाने, डॉ. शिल्पा जीवरग प्रा. प्रफुल्ल देवरे डॉ. राजू वनारसे डॉ.राजू तुपे डॉ. विक्रम भुतेकर प्रा. निखिल भिसे डॉ. श्रीकांत जाधव डॉ. तुषार कांबळे डॉ. राम हरी सोंडगे आदी मंडळी या कार्यक्रम प्रसंगी विशेषत्वाने उपस्थित होती. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप डॉ.भास्कर टेकाळे यांनी केला तर सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. गोविंद फड यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. वीरेंद्र सुरासे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी प्रयत्न केले व कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी संख्या उपस्थित होती.







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २५ सप्टेंबर २०२६


## डॉ.बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालय छत्रपती संभाजी नगर राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन उत्साहान साजरा

**छत्रपती संभाजीनगर :** पीपल्स एज्युकेशन सोसायटी( मुंबई) संचालित डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालय छत्रपती संभाजी नगर येथे राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सामाजिक बांधिलकी, समाज सेवा, राष्ट्रसेवा आणि विद्यार्थ्यांचे सर्वांगिण विकास निर्माण करण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्याचे महत्व यावेळी अधोरेखित करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयातील समाजशास्त्र विभाग प्रमुख व सीडीसी अध्यक्ष प्रा. डॉ. एस. पी. खिल्लारे होते. या प्रसंगी बोलताना ते म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजना ही विद्यार्थी- शिक्षक आणि समाज यांना जोडणारी कडी आहे. एन. एस. एस. च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञान न मिळता प्रत्यक्षात समाज शिक्षणाचे धडे अनुभवता येतात त्यातून त्यांचे सामाजिक आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना समृद्ध बनते. स्वच्छता अभियान पर्यावरण संवर्धन, व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा निर्मूलन ,रक्तदान, आरोग्य जनजागृती अशा विविध उपक्रमात सक्रीय सहभाग घ्यावे असे या प्रसंगी त्यांनी विद्यार्थाना आवाहन केले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी उप प्राचार्य प्रा. नागनाथ करडे यांनी प्रास्ताविकातून राष्ट्रीय सेवा योजना स्थापने मागील इतिहास, उद्देश, स्वरूप , महत्व आणि रासेयो कार्यपद्धती यावर प्रकाश टाकला.कार्यक्रमाचे प्रमुख पाहूणे प्रा. मिलिंद ठोकळे( NSS कार्यकमाधिकारी, कला महाविद्यालय बिडकीन) यांनी Not me But you" या एन. एस . एस. च्या ब्रीद वाक्या नुसार NSS च्या स्वयंसेवकाची कृती ही स्वसाठी नसून ती इतरांसाठी असते. समाजसेवेची प्रेरणा, राष्ट्रीय कर्तव्याची जाणीव आणि" मी नव्हे, तुम्ही" या सेवाभावी विचार संस्काराने विद्यार्थ्याचे व्यक्तिमत्व संपन्न बनते अशी भावना व्यक्त केली. ते पुढे बोलताना असे ही म्हणाले की,समाजसेवेतून शिक्षण ही व्यापक सामाजिक, राष्ट्रीय जाणीव आणि विद्यार्थ्यामध्ये नेतृत्व गुण विकसित करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. एन. एन. गोरे यांनी ही सर्व उपस्थितांना मार्गदर्शन करून राष्ट्रीय सेवा योजना वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.राष्ट्रीय सेवा योजना वर्धापन दिना निमित्त घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धा, पोस्टर स्पर्धा निबंध लेखन स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे प्रदान करण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहायक कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. गौतम घाडगे यांनी तर आभार डॉ अशोक केवटे यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी IQAC चे प्रमुख प्रा. डॉ. बी. एन. शिंदे, वाणिज्य विभाग प्रमुख प्रो. डॉ. शारदा बूधवत, प्रा. डॉ. सतिष वाघमारे, डॉ. पी. के. वाघमारे डॉ. प्रज्ञा रुईकर- साळवे डॉ. रेश्मा गरड, डॉ. वनमाला लोखंडे कार्यालयीन अधिक्षक श्री. राजू पट्टेकर , करण वानखडे, मीना कचरे, वर्षा आठवले, सुनिल धनराज, साक्षी आठवले यांनी विशेष सहकार्य केले. या प्रसंगी सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## व्यक्तीमत्व विकासासाठी राष्ट्रीय सेवा योजनेत सहभाग आवश्यक - प्रा. अशोक भोसीकर



**कन्नड :** " विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्व विकासासाठी राष्ट्रीय सेवा योजनेत विद्यार्थ्यांचा सहभाग आवश्यक आहे. या योजनेत सहभागी विद्यार्थ्यांना समाजासाठी काम करण्याची संधी मिळते. संघ भावना निर्माण होते, नेतृत्व तसेच वक्तृत्वाचा विकास होतो." असे प्रतिपादन प्रा. अशोक भोसीकर यांनी केले ते राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त आयोजित संत तुकाराम महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रमात बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा डॉ शरद गावंडे यांनी महाविद्यालयातील विद्यार्थीना राष्ट्रीय सेवा योजनेत सहभागी होण्याचे आवाहन केले, तसेच विद्यार्थी जीवनात समाजाप्रती असलेल्या जबाबदारी बद्दल सजग राहण्याचा सल्ला दिला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रा. से. यो. कार्यक्रमाधिकारी प्रा डॉ तुकाराम कोल्हे यांनी केले, त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनाच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रा. से. यो. कार्यक्रमाधिकारी उपप्राचार्य प्रा डॉ सरला गोरे यांनी केले व उपस्थितांचे आभार प्रा. अमोल भोसले यांनी मानले. यावेळी रो. से. यो. स्वयंसेवक, विद्यार्थी व प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिक्षक बदलीसाठी दीड लाखांची लाच; स्वीय सहाय्यकाला ३ दिवसांची पोलीस कोठडी




**रायगड :** जिल्हा परिषदेत शिक्षकांच्या बदलीच्या कामासाठी पैशांची मागणी केल्याच्या आरोपावरून रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांचे स्वीय सहाय्यक योगेश प्रकाश भस्मे यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (ACB) रंगेहात पकडले. तक्रारदाराच्या पत्नीची बदली करून देण्यासाठी १ लाख ५० हजार रुपयांची लाच मागितल्याचा आरोप भस्मे यांच्यावर आहे. बुधवारी (२३ सप्टेंबर) सापळा रचून ही कारवाई करण्यात आली. त्यानंतर गुरुवारी त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले असता तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आल्याची माहिती आहे. रायगड जिल्हा परिषद अंतर्गत शिक्षकांच्या बदल्यांची प्रक्रिया सुरू असताना ही घटना समोर आली. तक्रारदाराच्या पत्नीची बदली करून देण्यासाठी भस्मे यांनी दीड लाख रुपयांची मागणी केल्याचा आरोप आहे. लाच देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदाराने या प्रकरणाची माहिती रायगड ACBकडे दिली. तक्रार प्राप्त झाल्यानंतर ACBच्या अधिकाऱ्यांनी प्रथम तक्रारीतील आरोपांची पडताळणी केली. त्यानंतर लाचेची रक्कम स्वीकारताना आरोपीला पकडण्यासाठी सापळा रचण्यात आला. ACBच्या पथकाने नियोजनबद्ध पद्धतीने कारवाई करत भस्मे यांना लाचेची रक्कम स्वीकारताना ताब्यात घेतले. काही वृत्तांनुसार ही कारवाई जिल्हा परिषद अध्यक्षांच्या दालनाशी संबंधित ठिकाणी, तर काही वृत्तांनुसार शहरातील एका हॉटेलमध्ये करण्यात आली. उपलब्ध वृत्तांमध्ये कारवाईच्या ठिकाणाबाबत फरक असल्याने अधिकृत तपासातील तपशील महत्त्वाचा ठरणार आहे. भस्मे हे रायगड जिल्हा परिषदेच्या वित्त विभागात वित्त लेखा सहाय्यक म्हणून कार्यरत असल्याचे वृत्त आहे. त्यांच्याकडे जिल्हा परिषद अध्यक्षांचे स्वीय सहाय्यक म्हणूनही जबाबदारी होती. त्यामुळे या कारवाईनंतर जिल्हा परिषद प्रशासनात चर्चेला उधाण आले आहे. ACBने कारवाई केल्यानंतर भस्मे यांना न्यायालयासमोर हजर केले. पुढील तपासासाठी त्यांची पोलीस कोठडी मागण्यात आली. न्यायालयाने त्यांना तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावल्याची माहिती आहे. या काळात लाच मागणीची पार्श्वभूमी, पैशांचा व्यवहार, बदलीच्या प्रक्रियेत भस्मे यांची नेमकी भूमिका आणि या प्रकरणाशी संबंधित इतर व्यक्तींचा सहभाग आहे का, याबाबत तपास केला जाण्याची शक्यता आहे. या प्रकरणातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे दीड लाख रुपयांच्या कथित लाचेच्या व्यवहारामागे आणखी कोणाचा सहभाग होता का, हा.

## माळीवाडा अंगणवाडीत 'वेलकम मेळावा'; चिमुकल्यांचे उत्साहात स्वागत



**दौलतबाद (जावेद अहमद) :** ग्रामपंचायत माळीवाडा येथील अंगणवाडी क्रमांक-3 मध्ये चिमुकल्या विद्यार्थ्यांसाठी 'वेलकम मेळावा' मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यात नवीन विद्यार्थ्यांचे उत्स्फूर्त स्वागत करून त्यांना अंगणवाडीच्या प्रवासासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.या कार्यक्रमाची सुरुवात ग्रामपंचायत अधिकारी बी.बी. गव्हाणे यांनी राष्ट्रगीताने केली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले.विविध विषयांवर सखोल मार्गदर्शन:मेळाव्यामध्ये उपस्थित माता आणि पालकांना बालकांचा दैनंदिन आहार, लहान मुलांचे दैनंदिन जीवन, मातांचा आहार आणि वेळेवर लसीकरण करण्याचे महत्त्व याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. महिला व बालविकास उपक्रमांतर्गत ग्रामपंचायत अधिकारी बी.बी. गव्हाणे यांनी उपस्थितांना सखोल माहिती दिली. या प्रसंगी अंगणवाडीत विविध प्रकारचे मनोरंजक व शैक्षणिक उपक्रमही राबवण्यात आले.मान्यवरांची लक्षणीय उपस्थिती:या कार्यक्रमाला जिल्हा परिषद सदस्या लंकाताई जाधव, माजी ग्रामपंचायत सदस्या मंदाकिनी कोर्तीकर, कडुभाऊ कोर्तीकर, मनेशभाऊ गाजरे, नंदकिशोर मुळे , प्रमोद साठे,ताराबाई तुपे, अंगणवाडी पर्यवेक्षिका काथार एस.एस. व श्रीमती मोरकर,गणेश अस्वार उपस्थित होते.या मेळाव्यासाठी दौलताबाद, अब्दिमंडी, रावरसपुरा, शरणापूर, करोडी, केसापुरी, रामपुरी आणि सिरसमाळ येथील सर्व अंगणवाडी सेविका, मदतनीस, तसेच मोठ्या संख्येने माता, पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन बाळकृष्ण गव्हाणे यांनी केले. शेवटी राष्ट्रगीत आणि राज्यगीताने या यशस्वी मेळाव्याची सांगता करण्यात आली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २५ सप्टेंबर २०२६

## भाजपमधून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आलेल्या हिंमत राठोडाना पक्षाने दिली मोठी संधी




**हिंगोली :** सातपुते हिंगोली । भारतीय जनता पक्षातून काही महिन्यांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत सहभागी झालेले सेनगाव तालुक्यातील डोंगरगाव येथील हिंमत राठोड यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या ओबीसी विभागाच्या हिंगोली जिल्हाध्यक्ष पदी निवड करण्यात आली हि निवड राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजितदादा पवार व प्रदेशध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या आदेशाने ओबीसी प्रदेशाध्यक्ष कल्याणकाका आखाडे व राष्ट्रवादी काँग्रेसचे हिंगोली जिल्हाध्यक्ष अनिलभाऊ पतंगे यांच्याहस्ते निवडीचे पत्र मुंबई येथे प्रदेश कार्यालयात देण्यात आले. हिंमत राठोड यांनी भारतीय जनता पार्टी मध्ये असताना सेनगाव तालुकाध्यक्ष जिल्हा चिटणीस युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष अशा विविध पदावर काम केले परंतु काही महिन्यापूर्वी भाजपला अंतर्गत गटबाजी मुळे राम राम करीत त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आमदार राजू भैया नवघरे व जिल्हाध्यक्ष अनिलभाऊ पतंगे यांच्या नेतृत्वाखाली प्रवेश केला होता तेव्हापासून त्यांना कोणती जिम्मेदारी मिळणार याकडे सर्वांचे लक्ष लागले होते परंतु त्यांची असलेली ओबीसी समाजावरची पकड पाहता त्यांच्यावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने थेट ओबीसी जिल्हाध्यक्ष पदाची धुरा सोपवल्याने आता हिंगोली जिल्ह्यात पक्ष जोमाने वाढणार असल्याचे दिसून येत आहे. हिंमत राठोड बंजारा समाजाचे मोठे नेते म्हणून जिल्ह्याभरात सर्वपरिचित आहेत त्याचबरोबर त्यांनी ओबीसी समाजाच्या वेगवेगळ्या आंदोलनाच्या माध्यमातून विविध प्रश्न मार्गी लावले आहेत व ओबीसी समाजाचा कोणताही प्रश्न असो ते नेहमी अग्रेसर राहतात त्यांच्या या कामामुळे त्यांच्यावर राष्ट्रवादी काँग्रेसच्या ओबीसी विभागाच्या हिंगोली जिल्हाध्यक्ष पदाची जिम्मेदारी सोपवल्याचे बोलले जात आहे या निवडीबद्दल हिंमत राठोड म्हणाले की येणाऱ्या काळात होऊ घातलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ओबीसी सेल विभागाचे हिंगोली जिल्ह्यात पाचही तालुक्यात मोठ्या प्रमाणात संघटन वाढवून पक्ष बळकट करून मोठी उभारी देणार असल्याचेही त्यांनी सांगितले व येणाऱ्या काळात सर्व ओबीसी घटकांना सोबत घेऊन जिल्हा बांधणी व तालुका संघटन जोमाने करणार असल्याचेही नूतन राष्ट्रवादी काँग्रेसचे ओबीसी जिल्हाध्यक्ष हिंमत राठोड यांनी सांगितले. यावेळी राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष वैशालीताई नागवडे राष्ट्रवादीचे सेनगाव तालुकाध्यक्ष रवींद्र गडदे राजकुमार देशमुख विजय डोखळे अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष अब्दुला पठाण यांच्यासह अनेक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चांदमारी नंदनवन कॉलोनी मधून २६ वर्षीय तरुण बेपत्ता



**दौलताबाद (जावेद अहमद) :** चांदमारी नंदनवन कॉलोनी मधून 26 वर्षीय तरुण बेपत्ता छावणी पोलीस ठाण्याच्या हद्दीतून शेख उमेर शेख अजीमुद्दीन (वय 26 वर्षे) हा तरुण बेपत्ता झाला असून, अज्ञात व्यक्तीने त्याला फुस लावून पळवून नेल्याची तक्रार पोलिसांत नोंदवण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार रुबीना बेगम शेख (वय 48 वर्षे, रा. चांदमारी, न्यू नंदनवन कॉलनी, छत्रपती संभाजीनगर) यांचा मुलगा शेख उमेर हा दि 5 सप्टेंबर 2026 रोजी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास 'कामावर जातो' असे सांगून घरातून निघाला होता. मात्र, तो रात्री उशिरापर्यंत घरी परतला नाही. नातेवाईकांनी त्याच्या मोबाईलवर साधण्याचा प्रयत्न केला असता त्याचा फोन बंद येत होता.नातेवाईक आणि परिचितांकडे शोध घेऊनही उमेरचा कोणताही पत्ता न लागल्याने, अखेर त्याच्या आईने छावणी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या बेपत्ता तरुणाचे वर्णन खालीलप्रमाणे आहे शेख उमेर शेख अजीमुद्दीन (वय 26 वर्षे)उंची: 182 सें.मी. (अंदाजे 6 फूट)रंग व बांधा: निमगोरा रंग, उभट चेहरा, सरळ नाक आणि सडपातळ बांधा.केस व भाषा: काळे केस असून तो मराठी आणि हिंदी भाषा बोलतो.अंगावरील कपडे: घराबाहेर पडताना त्याच्या अंगात काळ्या रंगाचे जॅकेट हुडी, निळ्या रंगाची जीन्स पँट आणि पायात काळ्या रंगाचे शूझ होते.नागरिकांना आवाहन:या वर्णनाचा कोणताही तरुण आढळल्यास किंवा या संदर्भात काहीही माहिती मिळाल्यास तातडीने छावणी पोलीस स्टेशन, छत्रपती संभाजीनगर येथे किंवा तपास अधिकारी इम्तियाज अहमद यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## आसेगाव स्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेतून गणरायाचा भव्य आविष्कार



**दौलताबाद (जावेद अहमद) :** विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेतून साकारला गणरायाचा भव्य आविष्कार: आसेगावच्या दादासाहेब चव्हाण पाटील स्कूलमध्ये अनोखा उपक्रम गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर येथील कै. दादासाहेब चव्हाण पाटील इंग्लिश स्कूल आसेगाव च्या विद्यार्थ्यांनी कलात्मकतेला आणि सृजनशीलतेला वाव देणारा एक अनोखा उपक्रम अत्यंत उत्साहात पार पडला. शाळेच्या विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे आणि शिस्तबद्ध पद्धतीने बसून, आपल्या कल्पकतेच्या जोरावर गणपती बाप्पाचा एक भव्य व अत्यंत आकर्षक आविष्कार प्रांगणात साकारला.शाळेच्या प्रशस्त प्रांगणात विद्यार्थ्यांनी केलेली ही सामूहिक मानवी रचना (Human Chain/Formation) उपस्थितांचे मुख्य आकर्षण ठरली. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सृजनशीलता, कलात्मकता, संघभावना, शिस्त, नियोजनकौशल्य आणि सामूहिक कार्याची भावना विकसित होण्यास मोठी मदत झाली. यशस्वी आयोजनासाठी व्ही. पी. पल्हाळ, नितीन सरकटे, निखिल वाकळे, सिद्धेश्वर बर्वे, धम्मपाल कांबळे, साधना वाघाले, सुनंदा सुराशे, मुक्ता दवंडे, सोनाली भगत, नीता सरकटे, काजल पल्हाळ, उज्वला कानेरकर आणि शेखर आस्वार यांनी विशेष परिश्रम घेतले.संस्कृती व परंपरांची जपणूक करू: संचालक मंडळयाप्रसंगी शाळेचे संचालक लक्ष्मण पुंडलिक पल्हाळ व ज्योती लक्ष्मण पल्हाळ यांनी उपक्रमासाठी मेहनत घेणाऱ्याचे कौतुक करून आभार व्यक्त केले. शाळेचे मुख्याध्यापक शत्रुघ्न नामदेव जेठे यांनी आभार मानले.



महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २५ सप्टेंबर २०२६

# अंत्योदय : विकासाच्या केंद्रस्थानी शेवटचा माणूस

भारताच्या विकासाचा प्रवास आर्थिक प्रगती, औद्योगिकीकरण, विज्ञान-तंत्रज्ञान, शिक्षण आणि पायाभूत सुविधांच्या विस्तारातून वेगाने पुढे जात आहे. मात्र विकासाची खरी फलश्रुती तेव्हाच मानता येते, जेव्हा त्याचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचतो. आर्थिकदृष्ट्या दुर्बल, सामाजिकदृष्ट्या वंचित, भौगोलिकदृष्ट्या दुर्गम किंवा विविध कारणांनी विकासाच्या संधींपासून दूर राहिलेल्या व्यक्तीला सन्मानाने जगण्याची संधी मिळणे ही कल्याणकारी समाजव्यवस्थेची मूलभूत गरज आहे. या व्यापक विचाराला 'अंत्योदय' असे संबोधले जाते. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त 25 सप्टेंबर हा दिवस 'अंत्योदय दिन' म्हणून पाळला जातो. त्यामुळे हा दिवस केवळ स्मरणाचा दिवस न राहता समाजातील दुर्बल घटकांच्या विकासाचा आणि सामाजिक उत्तरदायित्वाचा विचार करण्याची संधी ठरतो.'अंत्योदय' या शब्दाचा अर्थ समाजातील शेवटच्या व्यक्तीचा उदय असा होतो. मात्र त्याचा अर्थ केवळ आर्थिक मदत किंवा दारिद्र्यनिर्मूलनापुरता मर्यादित नाही. शिक्षण, आरोग्य, रोजगार, निवारा, सामाजिक सुरक्षा, समान संधी, स्वावलंबन आणि मानवी सन्मान या सर्वांचा त्यात समावेश होतो. एखाद्या व्यक्तीला तात्पुरता आधार देणे आवश्यक असले तरी तिला स्वतःच्या क्षमतेवर उभे राहण्याची संधी देणे अधिक महत्त्वाचे आहे. त्यामुळे अंत्योदयाचा केंद्रबिंदू 'मदत' नसून 'सक्षमीकरण' हा आहे.पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी मांडलेल्या 'एकात्म मानववाद' या विचाराशी अंत्योदयाचा जवळचा संबंध आहे. त्यांच्या विचारांमध्ये मनुष्याचा सर्वांगीण विकास महत्त्वाचा होता. व्यक्तीला केवळ आर्थिक घटक म्हणून न पाहता तिच्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक आणि सामाजिक गरजांचा विचार झाला पाहिजे, अशी त्यांच्या विचारांची व्यापक दिशा होती. समाजातील शेवटच्या व्यक्तीच्या जीवनमानात सुधारणा झाल्याशिवाय विकास पूर्ण होऊ शकत नाही, हा अंत्योदयाच्या विचाराचा मूलभूत आशय आहे. या विचाराचे आजच्या काळातील मूल्यमापन करताना त्याला सामाजिक न्याय, समान संधी आणि समावेशक विकासाच्या व्यापक चौकटीत पाहणे आवश्यक ठरते.भारतातील सामाजिक वास्तव पाहिले तर अंत्योदयाची आवश्यकता स्पष्ट होते. ग्रामीण भागातील भूमिहीन कुटुंबे, अल्पभूधारक शेतकरी, शेतमजूर, आदिवासी समुदाय, भटके-विमुक्त समाज, असंघटित क्षेत्रातील कामगार, स्थलांतरित कामगार, निराधार महिला, वृद्ध आणि दिव्यांग व्यक्ती यांच्यासमोर वेगवेगळ्या स्वरूपाची आव्हाने आहेत. काहींना शिक्षणाची कमतरता भेडसावते, काहींना रोजगाराच्या संधी मर्यादित असतात, तर काहींना आरोग्य किंवा मूलभूत सुविधांपर्यंत पोहोचण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागतो. त्यामुळे अंत्योदयाची संकल्पना एका विशिष्ट आर्थिक वर्गापुरती मर्यादित न ठेवता विविध प्रकारच्या वंचिततेकडे व्यापकपणे पाहण्याची गरज आहे.शिक्षण हे या प्रक्रियेतील सर्वांत प्रभावी साधन आहे. शिक्षण व्यक्तीला ज्ञानाबरोबरच विचारशक्ती, कौशल्य, आत्मविश्वास आणि निर्णयक्षमता देते. ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळणे, मुलींच्या शिक्षणातील अडथळे दूर होणे आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना आवश्यक आधार मिळणे गरजेचे आहे. आज डिजिटल माध्यमांनी शिक्षण आणि सार्वजनिक सेवांचे स्वरूप बदलले आहे. त्यामुळे डिजिटल साक्षरता, इंटरनेटचा प्रवेश आणि तंत्रज्ञानाचा सुरक्षित व परिणामकारक वापर करण्याची क्षमता यांनाही विकासाच्या प्रक्रियेत महत्त्व मिळाले आहे. डिजिटल साधने उपलब्ध असूनही ती वापरण्याची क्षमता नसल्यास नव्या प्रकारची सामाजिक दरी निर्माण होऊ शकते.आरोग्याच्या क्षेत्रातही सर्वसमावेशकता आवश्यक आहे. गरीब कुटुंबासाठी गंभीर आजार हा आरोग्याबरोबरच आर्थिक संकटाचा प्रश्न बनू शकतो. ग्रामीण आणि दुर्गम भागात प्राथमिक आरोग्यसेवा, औषधे, तपासणी आणि तज्ज्ञ उपचार सहज उपलब्ध होणे गरजेचे आहे. महिला, बालके, वृद्ध आणि दिव्यांग व्यक्तींच्या विशेष आरोग्यविषयक गरजांकडेही लक्ष दिले पाहिजे. आरोग्यसेवेचा लाभ आर्थिक क्षमतेवर अवलंबून राहू नये, ही कल्याणकारी व्यवस्थेची महत्त्वाची कसोटी आहे.अंत्योदयाचा आर्थिक आधार म्हणजे शाश्वत उपजीविका. गरिबी कमी करण्यासाठी केवळ आर्थिक सहाय्य पुरेसे नसते; व्यक्तीला रोजगार, कौशल्य आणि उत्पन्नाचे स्थिर साधन उपलब्ध झाले पाहिजे. ग्रामीण युवकांसाठी कौशल्यविकास, शेतीपूरक व्यवसाय, स्वयंरोजगार आणि स्थानिक उद्योगांच्या संधी वाढविणे आवश्यक आहे. महिलांसाठी स्वयं-सहायता गट, कौशल्य प्रशिक्षण आणि उद्योजकतेला प्रोत्साहन दिल्यास कुटुंबाच्या उत्पन्नात वाढ होण्याबरोबरच त्यांचा सामाजिक सहभागही वाढतो. रोजगार ही केवळ आर्थिक गरज नसून आत्मसन्मान आणि स्वावलंबनाशी जोडलेली बाब आहे.महिलांच्या सक्षमीकरणाला अंत्योदयाच्या प्रक्रियेत स्वतंत्र महत्त्व आहे. कुटुंब आणि अर्थव्यवस्थेत महिलांचे योगदान मोठे असूनही त्यांच्या श्रमांना अनेकदा अपेक्षित मान्यता मिळत नाही. शिक्षण, आर्थिक साक्षरता, सुरक्षित रोजगार, मालमत्तेवरील अधिकार, उद्योजकता आणि निर्णयप्रक्रियेत सहभाग या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण करता येते. महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्यास त्याचा परिणाम मुलांच्या शिक्षणावर, कुटुंबाच्या आरोग्यावर आणि एकूण सामाजिक स्थितीवर होतो. त्यामुळे महिला सक्षमीकरण हा केवळ लैंगिक समानतेचा विषय नसून सामाजिक विकासाचा महत्त्वाचा घटक आहे.आदिवासी समाजाच्या विकासाचा विचार करताना त्यांच्या सामाजिक व सांस्कृतिक वैशिष्ट्यांचा आदर करणे आवश्यक आहे. दुर्गम भौगोलिक परिस्थितीमुळे शिक्षण, आरोग्य, वाहतूक आणि रोजगाराच्या संधी अनेकदा मर्यादित राहतात. त्याचबरोबर आदिवासी समुदायांच्या पारंपरिक ज्ञानाचा आणि स्थानिक संसाधनांशी असलेल्या संबंधाचा विचार विकासाच्या प्रक्रियेत केला पाहिजे. त्यांना केवळ योजनांचे लाभार्थी न मानता विकासाच्या नियोजनात सहभागी करून घेणे अधिक परिणामकारक ठरू शकते.दिव्यांग व्यक्तींच्या बाबतीतही अंत्योदयाचा अर्थ समान संधी निर्माण करणे हा आहे. शिक्षण, रोजगार, सार्वजनिक वाहतूक, शासकीय कार्यालये आणि डिजिटल सेवांमध्ये सुलभता उपलब्ध असणे आवश्यक आहे. दिव्यांग व्यक्तींकडे दयेच्या दृष्टिकोनातून न पाहता त्यांच्या क्षमता आणि अधिकारांच्या दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे. त्यांना स्वावलंबी होण्यासाठी आवश्यक कौशल्ये, साधने आणि संधी उपलब्ध करून देणे ही समावेशक समाजाची जबाबदारी आहे. वृद्ध नागरिकांच्या जीवनातील प्रश्नांकडेही अंत्योदयाच्या दृष्टीने पाहणे आवश्यक आहे. कुटुंबव्यवस्थेतील बदल, स्थलांतर, आरोग्यविषयक अडचणी आणि आर्थिक असुरक्षितता यांमुळे काही वृद्धांना एकटेपणाचा किंवा आधाराच्या अभावाचा सामना करावा लागतो. आरोग्यसेवा, सामाजिक सुरक्षा, सुरक्षित निवारा आणि सामाजिक सहभागाच्या संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. वृद्ध हे समाजावरील ओझे नसून अनुभव आणि ज्ञानाचा महत्त्वाचा स्रोत आहेत. त्यांच्या सन्मानाचे संरक्षण करणे ही सामाजिक संवेदनशीलतेची कसोटी आहे.ग्रामीण विकास आणि अंत्योदय यांचा जवळचा संबंध आहे. रस्ते, पाणी, वीज, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण आणि डिजिटल संपर्क यांसारख्या मूलभूत सुविधा गावांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. त्याचबरोबर ग्रामसभेचे सक्षमीकरण, लोकसहभाग आणि पारदर्शक प्रशासन यांना महत्त्व दिले पाहिजे. ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी वाढल्या तर स्थलांतराची गरज कमी होऊ शकते आणि स्थानिक अर्थव्यवस्था मजबूत होऊ शकते. दुसरीकडे, शहरी भागातील असंघटित कामगार, स्थलांतरित कुटुंबे आणि झोपडपट्टीतील रहिवाशांच्या निवारा, आरोग्य आणि सामाजिक सुरक्षेच्या प्रश्नांचाही विचार करावा लागतो.अंत्योदयाच्या दृष्टीने शासनाच्या योजना महत्त्वाच्या असल्या तरी त्यांच्या प्रभावाचे अंतिम मोजमाप लाभार्थ्यांच्या जीवनातील बदलातून झाले पाहिजे. योजना जाहीर होणे आणि त्यांचा प्रत्यक्ष लाभ मिळणे यामध्ये अनेकदा अंतर असते. माहितीचा अभाव, कागदपत्रांची अडचण, प्रशासकीय प्रक्रिया, डिजिटल अपरिचितता किंवा भौगोलिक दुर्गमता यांमुळे पात्र व्यक्ती वंचित राहू शकते. त्यामुळे प्रशासन अधिक सुलभ, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख असणे गरजेचे आहे. सामाजिक लेखापरीक्षण, लोकसहभाग आणि परिणामाधारित मूल्यमापन यामुळे योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यास मदत होऊ शकते.आजच्या काळात अंत्योदयासमोर काही नवी आव्हानेही उभी आहेत. तंत्रज्ञानाच्या वेगवान विकासामुळे रोजगाराचे स्वरूप बदलत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि स्वयंचलित तंत्रज्ञानामुळे काही क्षेत्रांमध्ये नव्या संधी निर्माण होत असताना कौशल्यांच्या गरजाही बदलत आहेत. त्यामुळे युवकांसाठी कौशल्यविकास आणि पुनर्कौशल्य प्रशिक्षण आवश्यक झाले आहे. त्याचबरोबर हवामानबदल, पाण्याची टंचाई, नैसर्गिक आपत्ती आणि पर्यावरणीय असुरक्षितता यांचा परिणाम गरीब आणि असुरक्षित समुदायांवर अधिक होऊ शकतो. त्यामुळे पर्यावरणीय सुरक्षिततेचाही अंत्योदयाच्या व्यापक चौकटीत विचार केला पाहिजे. अंत्योदय ही केवळ शासनाची जबाबदारी नाही. समाजातील प्रत्येक घटकाची त्यात भूमिका आहे. शैक्षणिक संस्था वंचित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करू शकतात, स्वयंसेवी संस्था सामाजिक सेवेला हातभार लावू शकतात, उद्योगक्षेत्र रोजगार आणि कौशल्यविकासाच्या संधी निर्माण करू शकते आणि सामान्य नागरिक आपल्या परिसरातील गरजू व्यक्तींना उपलब्ध सुविधा व योजनांशी जोडण्यास मदत करू शकतात. सामाजिक संवेदनशीलता ही केवळ मोठ्या उपक्रमांमधून नव्हे तर दैनंदिन व्यवहारातूनही व्यक्त होते.25 सप्टेंबरचा अंत्योदय दिन म्हणून साजरा होणारा दिवस त्यामुळे आत्मपरीक्षणाची संधी आहे. आपल्या विकासाच्या प्रक्रियेत कोण मागे राहिले आहे, कोणाला अजूनही मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागतो आणि कोणाला समान संधी मिळालेल्या नाहीत, हे पाहणे आवश्यक आहे. शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचण्याची क्षमता ही कोणत्याही कल्याणकारी व्यवस्थेची महत्त्वाची कसोटी आहे. विकासाचे मोजमाप केवळ राष्ट्रीय उत्पन्न, मोठे प्रकल्प किंवा तंत्रज्ञानाच्या प्रगतीत न करता सामान्य नागरिकाच्या जीवनमानातील सुधारणेतही केले पाहिजे. अंत्योदयाचा विचार आजच्या काळात सामाजिक न्याय, समावेशक विकास आणि मानवी सन्मान यांच्याशी जोडून पाहण्याची गरज आहे. समाजातील दुर्बल घटकांना केवळ मदतीचे लाभार्थी न मानता त्यांना विकासाच्या प्रक्रियेतील सक्रिय सहभागी बनविणे आवश्यक आहे. शिक्षणातून क्षमता, रोजगारातून स्वावलंबन, आरोग्यातून सुरक्षितता, सामाजिक सुरक्षेतून आधार आणि समान संधींतून सन्मान मिळाला तर विकास अधिक अर्थपूर्ण होतो.समाजातील शेवटचा माणूस विकासाच्या केंद्रस्थानी आला की विकासाची दिशा अधिक मानवी आणि समावेशक बनते. म्हणूनच अंत्योदय हा केवळ एका दिवसाचा कार्यक्रम नसून सतत चालणारी सामाजिक बांधिलकी आहे. 25 सप्टेंबर हा दिवस आपल्याला ही बांधिलकी पुन्हा स्मरण करून देतो. समाजातील कोणतीही व्यक्ती तिच्या जन्मस्थानामुळे, आर्थिक परिस्थितीमुळे, सामाजिक स्थितीमुळे, वयामुळे किंवा दिव्यांगत्वामुळे संधींपासून वंचित राहू नये, ही व्यापक अपेक्षा अंत्योदयाच्या विचारातून व्यक्त होते. विकासाच्या प्रवाहात शेवटच्या व्यक्तीला स्थान मिळाले, तिच्या क्षमतांना संधी मिळाली आणि तिला सन्मानाने जगता आले, तरच विकासाची प्रक्रिया खऱ्या अर्थाने सर्वसमावेशक ठरेल.



डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra५@gmail.com